


# क्रांतीपर्व



## लोकशाहीप्रधान देशाची वाटचाल

प्रा. अमर जावळे

प्रा. भूषण काटे - पाटील

LAXMI BOOK PUBLICATIONS

Scanned with CamScanner

LAXMI BOOK PUBLICATION

Price: 300 /-

# क्रांतीपर्व

## लोकषाहीप्रधान देषाची वाटचाल

प्रा. अमर जावळे प्रा. भूषण काटे – पाटील

**© 2018 by Laxmi Book Publication, Solapur.**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages. [The responsibility for the facts stated, conclusions reached etc., is entirely that of the author. The publisher is not responsible for them, whatsoever.]

**ISBN– 978-0-359-01299-2**

**Published by,**
**Lulu Publication**
3101 Hillsborough St,
Raleigh, NC 27607,
United States.

**Printed by,**
**Laxmi Book Publication,**
258/34, Raviwar Peth,
Solapur, Maharashtra, India.
**Contact No.** : 9595359435
**Website:** http://lbp.world/
**Email ID:** apiguide2014@gmail.com

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | पंतप्रधान इंदिराजी: आणीबाणी व वृत्तपत्रावरील सेन्सोरशिप | १ |
| २ | सरदार वल्लभभाई पटेल आणि राजस्थान | १२ |
| ३ | इंदिरा पर्वातील राष्ट्रीय आणीबाणी - एक अभ्यास | १६ |
| ४ | स्व.इंदिरा गांधीच्या छत्रछायेतील काही वर्ष | २३ |
| ५ | **संस्थान के विलीनीकरण मे सरदार वल्लभभाई पटेल कि भूमिका** | २८ |
| ६ | **स्व.इंदिराजी गांधी यांच्या कारकीर्दिमधून नेतृत्व विकासाचे धडे** | ३३ |
| ७ | संस्थानिकांच्या विलिनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | ३८ |
| ८ | Vallabhbhai Jhaverbhai Patel and Faizpur Congress १९३६ | ४२ |
| ९ | सरदार वल्लभभाई पटेल : एक उत्तम प्रशासक | ५४ |
| १० | स्वर्गीय इंदिरा गांधी :: एक कणखर महिला नेतृत्व | ५८ |
| ११ | भारतीय राजनिती का चमकता तारा :- इंदिरा गांधी | ६१ |
| १२ | भारताच्या आर्थिक विकासातील इंदिरा गांधीचे योगदान | ६४ |
| १३ | **श्रीमती इंदिरा गांधी यांचे परराष्ट्रीय धोरण व भारतीय सुरक्षा** | ७० |
| १४ | लोह पुरूष आणि लेडी सरदार | ७४ |
| १५ | देशप्रेमी प्रियदर्शनी इंदिरा | ७८ |
| १६ | अखंडीत भारताचे प्रेणेते :- सरदार वल्लभभाई पटेल | ८० |
| १७ | इंदिरा गांधी - एक कार्यकाल नेतृत्व | ८३ |
| १८ | भारतातील ग्रामिण वित्तीय व्यवस्थेत इंदिरागांधी यांचे योगदान | ८४ |
| १९ | इंदीरागांधी समग्र विचार : आधुनिक काळाची गरज | ९१ |
| २० | भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान एक कणखर नेत्या - श्रीमती इंदीरा गांधी | ९५ |
| २१ | आणीबाणी “विरोधकांची” | ९९ |


Scanned with CamScanner

# भारतातील ग्रामिण वित्तीय व्यवस्थेत इंदिरागांधी यांचे योगदान

**डॉ. श्याम जीवन साळुंखे**
प्रमुख, वाणिज्य विद्याशाखा अ. र. भा. गरुड महाविद्यालय,
शेंदुर्णी, ता. जामनेर, जि. जळगाव.

स्वातंत्र्यपुर्व काळापासून देशातील वित्तीय व्यवस्था आणि बँकिंग व्यवस्था ही मोठे उद्योजक, व्यापारी किंवा सावकार यांची मालकी असलेली व्यवस्था म्हणुन ओळखली जात होती. त्यामुळे देशातील संपुर्ण बँकिंग व्यवस्था हि शहरात विशेषत: मोठ्या शहरांमध्ये एकवटलेली होती आणि ग्रामिण भाग मात्र वित्तीय सेवांपासून वंचितहोता त्याचा परिणाम म्हणुन ग्रामिण व्यवसायिक, व्यापारी, शेतकरी, ग्रामिण कारागीर, लघु उद्योजक, इ. मात्र वित्तपुरवठा अभावी आपला आर्थिकविकास साध्य करुशकत नव्हता. अशा परिस्थितीत ग्रामिण आणि कृषी अर्थव्यवस्थेचा विकास मात्र खुंटलेला होता.भारतीय अर्थव्यवस्था ही सुरवातीपासून कृषी अर्थव्यवस्था म्हणुन ओळखली जात आहे असे असतांनाहीखाजगी बँक व्यवस्थेमुळे हेक्षेत्र वित्तपुरवठ्याच्या दृष्टिने दुर्लक्षित होते.कारण ह्या उद्योजक बँकर्सच्या दृष्टिकोनातून वित्तीय व्यवस्थेच्या माध्यमातून नफा मिळविणे हाच त्यांचा प्रमुख हेतूहोता आणिहा नफा त्यांना फक्त शहरी भागातच मिळतो आणि ग्रामिण भागात बँकिंग व्यवस्थेचा प्रचार प्रसार नसल्यामुळे तेथील जनतेला बँकेचेकिंवा बँकिंग व्यवस्थेचे महत्व ज्ञात नसल्यामुळे बँकिंग व्यवसायाला ग्रामिण भागात प्रोत्साहन मिळत नव्हते, त्यामुळे प्राधान्य क्षेत्र असलेले कृषीक्षेत्र, लघुउद्योग, ग्रामिण कारागीर, शेतीपुरक उद्योग वित्तपुरवठ्या अभावी अविकसित राहिले व त्याचा परिणाम देशाच्या कृषीव ग्रामिण अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर होवू लागला होता.

देशाच्या कृषीव ग्रामिण विकासाच्या दृष्टिने स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकाने पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात प्राथमिक व प्राधान्य क्षेत्राचा विकास साध्य करण्याचे उद्दिष्टे ठरविले होते व ते उद्दिष्टे साध्य करण्याकरीता प्रयत्नही सुरु केलेत मात्र वित्तीय व्यवस्थेतील घटक असलेल्या वित्तीय संस्था ह्या भांडवलदारांची व मोठ्या उद्योगपतींची मक्तेदारी असल्यामुळे तसेच खाजगीक्षेत्रात कार्यरत असल्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्टे साध्य करण्यात सरकार अपयशी ठरले. पुढेजावून कॉंग्रेसशासित सरकारने पुन्हा प्राथमिक क्षेत्राचाव प्राधान्य क्षेत्राचाविकास या उद्दिष्ठांवर लक्ष केंद्रित केले मात्र त्याच अडचणी पुन्हा भेडसावू लागल्या म्हणून तत्कालीन पंतप्रधान स्व.इंदिरागांधी यांनी सत्तेवर आल्यापासूनच प्राधान्य क्षेत्राचा विकास या अनुषंगाने पाऊले उचलायला सुरवात केलीव भुवनेश्वर येथे झालेल्या राष्ट्रिय कॉंग्रेसच्या अधिवेशनात त्या संदर्भात सुतोवाचहीहोते.

सुरवातीपासून स्व.इंदिरागांधीह्या बँकांनी ग्रामिण भारतात जावून प्राधान्य क्षेत्राला तसेच लघूउद्योजकांना वित्तपुरवठा करावा जेणेकरुन त्यांचा विकास साध्य करण्यास मदत करावी परंतू वर नमुद केल्याप्रमाणे बँकावविविध वित्तीय सस्थाह्या भांडवलदारांची मक्तेदारी असल्यामुळे नफा कमविणे हाच एकमेव उद्देश त्यांचा होता म्हणुन ग्रामिण भागात त्यांचा व्यवसाय विकासाचीसंधी कमी असल्यामुळे शासनाने वेळोवेळी निर्देश देवुनही बँका ह्या ग्रामिण भागात जावून व्यवसाय करण्यास तयार होत नव्हत्या म्हणुन सर्वप्रथम इदिरागांधी यांनी बँकावर सामाजिक नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला.



Scanned with CamScanner

"... An Institution, such as the banking system, which touches and should touch the lives of millions, has necessarily to be inspired by a larger social purpose and has to subserve national priorities and objectives...." -- Indira Gandhi, Broadcast from All India Radio, July, १९६९

स्वातंत्र्योत्तर काळात १९४७ ते १९५५ यादरम्यान मोठ्याप्रमाणावर खाजगी बँका आर्थिकदृष्ट्या डबघाईला गेल्या त्यामुळे त्यांची विश्वासार्हता धोक्यात आली आणि याचा परिणाम म्हणून सुमारे ३६१ खाजगी बँकाह्या बंद केल्या गेल्या.ह्या बँकांनी फक्त आणि फक्त खाजगी क्षेत्राबरोबरच शहरी भागावरच आपले लक्ष केंद्रित केलेलेहोते त्यामुळे प्राधान्य क्षेत्र आणि देशातील कृषीक्षेत्र पुर्णपणे दुर्लक्षितहोते. म्हणुनच इंदिरागांधी यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या तत्कालीन सरकारने सुरवातीला बँकिंग कंपन्यांचा अधिनियम व नंतर बँकिंग कंपनी कायदा (Banking Companies (Acquisition and Transfer of Undertakings) Act) आणून१४ मोठ्या खाजगी बँकाचेसरकारीकरणाचा म्हणजेच ज्या बँकांच्या एकुण सार्वजनिक ठेवी ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त होत्या म्हणजेच ह्या बँकांनी साधारणत: देशातील एकुण ७०% ठेवी या बँकाकडे एकवटलेल्या होत्या, अशा देशातील १४ बँकांचे राष्ट्रियीकरण करण्याचा निर्णय घेतला आणिह्या बँका सरकारच्या नियंत्रणाखाली आणल्या गेल्या व या माध्यमातून प्राधान्यक्षेत्र, कृषीक्षेत्र आणि ग्रामिण तसेच ग्रामिण कारागीरांना सढळ हस्ते वित्तपुरवठा करुन ह्या क्षेत्राचाविकास साध्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. या अनुषंगाने बँकांचे राष्ट्रियीकरणाची अंमलबजावणी संपुर्ण देशात १९ जुलै, १९६९ पासून करण्यात आली.त्या १४ राष्ट्रियीकृत बँका पुढिलप्रमाणे:

- अलाहाबाद बँक
- बँक ऑफ बडोदा
- बँक ऑफ इंडिया
- बँक ऑफ महाराष्ट्र
- कॅनरा बँक
- सेंट्रल बँक ऑफ इंडिया
- देना बँक
- इंडियन बँक
- पंजाब अँड सिंध बँक
- सिंडिकेट बँक
- इंडियन ओव्हरसिज बँक
- युको बँक
- पंजाब नॅशनल बँक
- युनायटेड बँक ऑफ इंडिया

**बँक राष्ट्रियीकरणामागचे राजकारण**

राष्ट्रियीकरणाचा निर्णय ज्यावेळेस तत्कालीन पंतप्रधान यांनी घेतला त्याकाळात काँग्रेस पक्ष हा मोठ्याप्रमाणावर अंतर्गत कलहाला सामोरे जातहोता त्यात प्रामुख्याने इंदिरा गांधी आणि तत्कालीनवित्त मंत्री मोरारजी देसाई या दोघांमध्ये वाद होता. त्याचा परिणाम म्हणुन काँग्रेस पक्षामध्ये पुढे जाऊन फूट पडली आणिइंदिरागांधी यांनी स्वत: सत्तेमध्ये उलथापालथ करुनवित्त मंत्रालयाचा पदभार काबीज केला. यामुळे मोरारजी देसाई यांनी नाराजी व्यक्त करत पुढिल वक्तव्य केले...

"If you wanted a change in the Finance Ministry, you could have discussed it with me... But now, you have behaved towards me in a manner in which no would behave even with clerk".

Morarji Desai

या राष्ट्रियीकरणाचा फायदा इंदिरा गांधी यांना मोठ्या प्रमाणावर झाला, त्याचा परिणाम म्हणुन १९७१ च्या सार्वजनिक निवडणुकित आणि १९७२ च्या राज्यांच्या निवडणुकित मोठ्याप्रमाणावर विजय मिळवून सत्तेवर आल्या."गरीबीहटाव" हा नाराघेवून दारिद्र्य निर्मुलनाचा उद्देश समोर ठेवून मुदतपुर्व निवडणुकिला सामोरे गेले आणि भारतीय जनतेने गरिबी दुर करण्याच्या मुद्यावर इंदिरागांधीयांना मोठ्या संख्येने मते देवून निवडुन दिले. कारण १९६९ च्या सुरवातीलाघेतलेलाखाजगी बँकावरिल सामाजिक नियंत्रणाचा निर्णय आणि त्यानंतर लगेचचघेतलेला १४ मोठ्या खाजगी



Scanned with CamScanner

बँकाचा राष्ट्रियीकरणाचा निर्णय याचा प्रमुख उद्देशच गरिबी हटाव आणि दारिद्र्य निर्मूलन हाच होता कारण, शहरी भागामध्ये वठलेला बँक व्यवसाय, शहरी भागाचे आकर्षण, नफा कमविणे हा प्रमुख उद्देश, शहरी भागामध्ये बँकांना मिळणाऱ्या मोठ्या प्रमाणावरिल ठेवी किंवा व्यवसाय, इ. कारणांमुळे बँकिंग व्यवसाय शहरी भागापासून लांब ग्रामिण भारतामध्ये जायला तयार नव्हत्या, ग्रामिण भागाला वित्तीय आणि बँकिंग सेवा उपलब्ध करुन द्यायला तयार नव्हत्या म्हणुनच इंदिरागांधी यांनी बँक राष्ट्रियीकरणाचा निर्णय घेवून खऱ्या अर्थानेगरिबीहटाव आणि दारिद्र्य निर्मूलनाच्यादृष्टिने महत्वपुर्ण पाऊल उचलले आणि त्याचा परिणाम म्हणुन कि काय जनतेने त्यांना १९७१ आणि १९७२ च्या सार्वजनिक निवडणुकित भरभरुन मते देवून केंद्रात आणि राज्यात इंदिरागांधी यांच्या नेतृत्वात शासन प्रस्थापित झाले.

**बँकाच्या राष्ट्रियीकरणाचे उद्देश**

देशातील १४ खाजगी मोठ्या बँकांच्या राष्ट्रियीकरणाचा प्रमुख उद्देश प्राधान्य क्षेत्राचा विकास याबरोबरच ग्रामिण आणि कृषीक्षेत्राचा विकास हा जरी असला तरी अजून काही बँक राष्ट्रियीकरणाचे उद्देश पुढिलप्रमाणे...

- बँकाकडील जनतेच्या ठेवींना प्रवाहित करुन त्यांचा जास्तित जास्त उत्पादक कार्यासाठी वापर करणे.
- बँकांची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टिकोनातून बँकानी सर्वसामान्य जनतेपर्यंत विशिष्ट सामाजिक उद्देशाने पोहोचणे आणि त्यांना जास्तित जास्त बँकिंगसेवा उपलब्ध करुन देणे.
- देशातील लहान व मोठ्या खाजगीक्षेत्रातील उद्योग व्यवसायांची वित्तपुरवठ्याची गरज भागविणे
- देशातील विविध खाजगी उत्पादक क्षेत्रालाजास्तित जास्त वित्तपुरवठा करत असतांना, देशातील प्राधान्य क्षेत्र, कृषीक्षेत्र, ग्रामिण क्षेत्र, ग्रामिण भागातील कारागीर, लघू व पुरक उद्योग, जोडधंदे यासह विविध खाजगी उद्योग व व्यवसायिकांना पुरेसा आणि समान पातळीवर वित्तपुरवठा करणे.
- प्राधान्य क्षेत्र आणि देशातील विविध प्रांतामधील आर्थिक दुर्बल, गरीब दुर्लक्षित घटकांना वित्तपुरवठा करण्याविषयी निर्देशित करणे.
- बँकांचा देशातील अनुत्पादक क्षेत्राला होणारा वित्तपुरवठा आणि त्यातील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवणे किंवा तो थांबविणे
- ग्रामिण भागात बँकांचा विस्तार करणे.
- देशातील कृषीक्षेत्राला होणारा वित्तपुरवठा वाढविणे, इ.

**बँक राष्ट्रियीकरणाचे सकारात्मक बदल**

बँक राष्ट्रियीकरणाचा परिणाम म्हणून देशातील वित्तीय व्यवस्थेत आणि ग्रामिण भारतात पुढिल काही सकारात्मक बदल निदर्शनास आलेले आहेत.

- **समाजहिताच्या दृष्टिने महत्वपुर्ण :** शहरी भागामध्ये एकवटलेल्या आणि मुठभर उद्योजकांची हाती बांधिल असलेले बँकिंग व्यवस्था ग्रामिण आणि निम्न शहरी भागात शाखा विस्तार आणि तेथील बचतीला चालना देवून ग्रामिण, कृषी, लघूउद्योग, कुटीर उद्योग यांना वित्तपुरवठा करणे व त्यामाध्यमातून समाजहित साध्य करण्याच्या अनुषंगाने महत्वपुर्ण निर्णय म्हणता येईल.
- **आर्थिकसत्तेचे विक्रेंद्रिकरण:** शहरी भागामध्ये एकवटलेल्या आणि मुठभर उद्योजकांची हाती बांधिल असलेले बँकिंग व्यवस्था ग्रामिण आणि निम्न शहरी भागात शाखा विस्तार करुन आर्थिक सत्तेचा शहरी भागाबरोबरच ग्रामिण भागातही विस्तार व्हायला लागला.



Scanned with CamScanner

- **किंमत स्थिरता:** ग्रामिण भागात आणि कृषी क्षेत्राला वित्तीय सोयी सुविधा उपलब्ध होऊ लागल्यामुळे, ग्रामिण जनतेच्या आणि शेतकऱ्यांच्या वित्तीय गरजा पुर्ण व्हायला लागल्या त्याचा परिणाम म्हणुन हंगामात शेतकऱ्याला आपला शेतमाल हंगाम आल्या आल्या विकावा लागत होता व त्यामुळे शेतमालाच्या किमतीत मोठी घट येत होती याबरोबरच शेतमालाच्या किमतीही झपाट्याने कमी होत होत्या त्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत होते मात्र बँक राष्ट्रियीकरणानंतर त्याला आपला शेतमाल घाईघाईने विकायची गरज नाही, बाजारात योग्य किंमत मिळेपर्यंत शेतकरी थांबू शकतो, त्याचा परिणाम म्हणुन बाजारात योग्य मुल्य शेतमालाला मिळू लागले, मागणी व पुरवठा यात समतोल आल्यामुळे किंमत स्थिर राहू लागल्यात.
- **प्राधान्य क्षेत्राला वित्तपुरवठा:** राष्ट्रियीकरणानंतर काही मोठ्या बँकाचे सार्वजनिक स्वरुपात रुपांतर झाल्यानंतर, बँकांचे ग्रामिण भागात शाखा विस्तार होऊ लागला त्याचा परिणाम म्हणुन देशातील प्राधान्यक्षेत्राला बऱ्यापैकी वित्तपुरवठा होऊ लागला.
- **निरुपयोगी स्पर्धेचे उच्चाटन आणि कार्यक्षतेने सत्तेचा वापर:** बँकिंग क्षेत्र खाजगी क्षेत्रात एकवटल्यामुळे त्याच्यांत नफा कमविण्याकरिता गळेकापू स्पर्धा निर्माण झाली होती, मात्र राष्ट्रियीकरणानंतर ह्या बँका शासनाच्या नियंत्रात आल्यामुळे बँकामधील ही स्पर्धा कमी झाली आणि त्यांचा क्षमतेचा वापर अधिक कार्यक्षमपणे होवू लागला.
- **ग्रामिण आणि अर्धशहरी भागांमध्ये बँक शाखांचा विस्तार आणि ठेवी प्रवाहित करणे:** शहरी भागामध्ये एकवटलेल्या आणि मुठभर उद्योजकांची हाती बांधिल असलेले बँकिंग व्यवस्था ग्रामिण आणि निम्न शहरी भागात शाखा विस्तार आणि तेथील बचतीला चालना देवून ग्रामिण, कृषी, लघूउद्योग, कुटीर उद्योग यांना वित्तपुरवठा करुन ग्रामिण आणि प्राधान्य क्षेत्राच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टिने मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल झाल्याचे निदर्शनास येते.
- **बँकसेवांचे प्रमाणिकरण:** खाजगी क्षेत्रात बँका कार्य करीत असल्यामुळे त्यांच्यात वाढणारी व्यवसायिक स्पर्धेचे परिणाम म्हणुन दिवसेंदिवस बँक सेवांचा दर्जा खालावल्याचेही काही चिन्ह होते त्याचा परिणाम म्हणुन खाजगी क्षेत्रातील ३६१ बँकाचा व्यवसाय बंद झाला, मात्र बँक राष्ट्रियीकरणामुळे ह्या बँकांच्या सेवांमध्ये सुधारणा करण्यात आल्या याबरोबरच बँक सेवांची गुणवत्ता वाढिच्या दृष्टिने प्रमाणिकरणही करण्यात आले.
- **काळापैशांवर निर्बंध:** बँक राष्ट्रियीकरणामुळे देशातील बँक व्यवस्था जी खाजगी क्षेत्रातील उद्योजक किंवा मुळभर श्रीमंत व्यक्तींच्या नियंत्रणात होती त्यामुळे काळ्या पैशांच्या व्यवहारांना खुप मोठ्याप्रमाणावर वाव मिळत होता परंतू राष्ट्रियीकरणानंतर ह्या बँका शासनाच्या नियंत्रणात आल्यामुळे काळ्यापैशांच्या व्यवहारांना लगाम बसली असल्याचे निदर्शशास येते.
- **नफा वाढ:** शहरी भागात एकवटलेली बँकिंग व्यवस्था राष्ट्रियीकरणानंतर ग्रामिण भागात जावून शाखा विस्ताराच्या माध्यमातून बँकिंग सेवा पुरवू लागल्यामुळे ग्रामिण पैसा बचतीच्या माध्यमातून प्रवाहात आला, भांडवल रुपाने उद्योग व्यवसाय यासह प्राधान्य क्षेत्र, कृषिक्षेत्र, इ. ना बऱ्यापैकी वित्तपुरवठा होवू लागला त्याचा परिणाम म्हणुन बँकाचे उत्पन्नात वाढ झाली आणि पर्यायाने नफ्यातही वाढ झाली.
- **आर्थिकविकास:** शहरी भागात एकवटलेली बँकिंग व्यवस्था राष्ट्रियीकरणानंतर ग्रामिण भागात जावून शाखा विस्ताराच्या माध्यमातून बँकिंग सेवा पुरवू लागल्यामुळे ग्रामिण पैसा बचतीच्या माध्यमातून प्रवाहात आला, भांडवल रुपाने उद्योग व्यवसाय यासह प्राधान्य क्षेत्र, कृषिक्षेत्र, इ. ना बऱ्यापैकी वित्तपुरवठा होवू लागला त्याचा परिणाम म्हणुन अर्थव्यस्थेतील शहरी आणि ग्रामिण भागातील घटकाल यामाध्यमातून वित्तपुरवठा होवू लागला त्यामुळे अर्थव्यवस्थेतील प्रत्येक घटकाच्या विकासात भर पडू लागली.

Scanned with CamScanner

### बँक राष्ट्रियाकरणावर झालेल्या टिका

बँक राष्ट्रियीकरणाचे सकारात्मक बदल जरी दिसत असले तरी राजकिय क्षेत्रातून आणि वित्तीय घटकांकडून काही टिकात्मक बाबी सुध्दा नोंदविल्या गेल्या त्या पुढिलप्रमाणे...

- **उत्पादित घटकांऐवजी राजकिय फायद्यासाठी:** बँक राष्ट्रियीकरणाला तत्कालीन वित्तमंत्र मोरारजी देसाई यांनी विरोध दर्शविलेला होता, तसेच तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी १९६९ च्या सुरवातीला घेतलेला बँकावरिल सामाजिक नियंत्रणाचा निर्णय आणि त्यानंतर त्याचवर्षी काही महिण्यानंतर घेतलेला बँक राष्ट्रियीकरणाचा निर्णय हा उत्पादित घटकांना वित्तपुरवठा करण्यासाठी घेतलेला नसून तो फक्त राजकीय हेतू साध्य करण्यासाठी घेतलेला आहे असा आरोप विरोधकांनी केलेला असल्याचे निदर्शनास येते.
- **राज्यस्तरावर भांडवलीकरणाकरिता उपयुक्त:** बँका ह्या जरी केंद्रिय पातळीवर कार्य करीत असल्या तरी त्याचा परिणाम हा राज्य पातळी वर गोळा करण्याच्या अनुषंगाने होईल व केंद्रपातळीवर मात्र त्याचा पुरेशा प्रमाणात उपयोग होणार नसल्याचे मत विरोधकांनी व्यक्त केले होते.
- **अकार्यक्षतेला वाव:** बँका ह्या खाजगी क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्पर्धाशक्ती दिवसेंदिवस वाढत होती त्यामुळे मानवी संसाधनाच्या कार्यक्षमतेचा वापर मोठ्या प्रमाणावर होत होता परंतू राष्ट्रियीकरणानंतर शासनाचे नियंत्रण प्रस्थापित झाल्यामुळे बँकांची स्पर्धाक्षमता कमी होईल, दप्तर दिरंगाई वाढेल आणि कर्मचारी अकार्यक्षम होतील असे काहींनी मत व्यक्त केले.
- **अनाकर्षकग्राहक सोयी सुविधा:** खाजगी बँक व्यवस्थेमध्ये व्यापर वाढीसाठी आणि अधिक नफा कमावण्यासाठी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध योजना किंवा सोयीसुविधा खाजगी बँकाकडून दिल्या जातात मात्र बँकांचे राष्ट्रियीकरणामुळे बँकावर शासनाचे नियंत्रण येईल त्यामुळे ह्या बँकामधील स्पर्धा कमी होईल व नफा वाढिसाठी प्रयत्न होणार नाहीत नवनवीन योजना बाजारात आणल्या जाणार नाहीत त्यामुळे बँक व्यवसायावर विपरित परिणाम होवू शकतात अशीही टिका झाली.
- **ग्राहक खात्यांविषयी गोपनियतेवर शंका:** खाजगी बँक व्यवस्थेमध्ये सेवेला प्राधान्य दिले जात होते तसेच व्यवसायाचा गोपनियतेचा भाग म्हणुन ग्राहकांची खात्याविषयी माहिती गोपनिय ठेवली जात होती परंतू राष्ट्रियीकरणानंतर खात्याविषयी माहिती गोपनिय ठेवली जाईल किंवा नाही याविषयी शंका निर्माण झाली होती.
- **शाखाविस्तार:** बँक राष्ट्रियीकरणापुर्वी बँका ह्या ज्याठिकाणी व्यवसाय मिळेल अशाच ठिकाणी शाखा विस्तार केला जात होता मात्र राष्ट्रियीकरणानंतर ग्रामिण आणि अर्धशहरी भागात प्राधान्य क्षेत्राला वित्तपुरवठा करण्याच्या उद्देशाने बँक शाखांचा मोठ्याप्रमाणावर विस्तार केला जाणार होता मात्र त्याकरिता मोठ्याप्रमाणा पायाभूत सोयीसुविधा निर्माण कराव्या लागतील, कर्मचारी भरती करावी लागेल मात्र त्यातुलनेने तेवढा व्यवसाय बॅकांना मिळेल किवा नाही यात शंका होती.

### बँक राष्ट्रियीकरणाची उपलब्धी

एकंदरीत बँक राष्ट्रियीकरणामुळे मोठ्या उद्योजकांची बँकिंग क्षेत्रातील मक्तेदारी नष्ट करण्याच्या अनुषंगाने आणि ग्रामिण बँक शाखाविस्तार याबरोबरच प्राधान्य क्षेत्राचा आर्थिक विकास याकरिता या बँक राष्ट्रियीकरणाची उपलब्धी पुढिलप्रमाणे नमुद करता येईल.



Scanned with CamScanner

- **शाखाविस्तारः** शहरी भागात एकवटलेल्या बँक शाखा राष्ट्रियीकरणानंतर ग्रामिण आणि अर्धशहरी भागात शाखाविस्तार होणार असल्यामुळे ग्रामिण, कृषी, ग्रामिण कारागीर, लघु उद्योजक आणि प्राधान्यक्षेत्राला बँकिंग सोयी सुविधा पुरविणे सहज शक्य झाले.
- **बँकठेवींचाविस्तारः** राष्ट्रियीकरणानंतर झालेल्या मोठ्या प्रमाणावरिल शाखा विस्ताराचा परिणाम शहरी भागाबरोबर ग्रामिण भागात अनुत्पादक स्वरुपात पडलेला जनतेकडिल पैसा बचतीच्यारुपाने बँकाकडे ठेव रुपाने गोळा होण्यास मदत झाली.
- **कर्जविस्तारः** राष्ट्रियीकरणानंतर झालेल्या मोठ्या प्रमाणावरिल शाखा विस्ताराचा परिणाम शहरी भागाबरोबर ग्रामिण भागात अनुत्पादक स्वरुपात पडलेला जनतेकडिल पैसा बचतीच्यारुपाने बँकाकडे ठेवरुपाने गोळा होण्यास मदत झाली आणि याचा परिणाम म्हणुन बँकाकडे मोठ्याप्रमाणावर वाटपयोग्य निधी किंवा भांडवल गोळा झाले त्यामुळे प्राधान्य, कृषी आणि ग्रामिण क्षेत्राला मोठ्याप्रमाणावर वित्तपुरवठा करणे शक्य होवू लागले.
- **सरकारी रोख्यांमध्ये गुंतवणुकः** बँकांवर शासनाचे नियंत्रण आल्यामुळे बँक शाखांचा ग्रामिण भागात शाखा विस्तार होऊ लागला मोठ्या प्रमाणावर ठेवरुपाने निधी गोळा होवू लागला त्याचा परिणाम म्हणुन बँका ह्या सरकारी रोख्यांमध्येही गुंतवणुक करु लागल्या.
- **सामाजिक बँकिंग, दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमः** प्राधान्य क्षेत्राचा आणि ग्रामिण, कृषी क्षेत्राचा विकास हा राष्ट्रियीकरणाचा प्रमुख उद्देश असल्यामुळे राष्ट्रियीकरणानंतर ह्या क्षेत्रांना बऱ्यापैकी वित्तपुरवठा होऊ लागला त्यामुळे बँका आपली सामाजिक जबाबदारीही यशस्वीपणे पार पाडू लागल्यात आणि देशातील ग्रामिण भागात असणाऱ्या दारिद्र्याच्या निर्मूलनाच्या दृष्टिने प्रयत्न करु लागलेत.
- **विविध व्याज योजनाः** राष्ट्रियीकरणानंतर ग्रामिण भागातील अतिरिक्त किंवा बचतयोग्य पैसा ठेवरुपाने गोळा करण्याच्या दृष्टिने विविध व्याजरुपी योजना ठेवी गोळा करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आमलात आणायला लागल्या होत्या.
- **लहानग्राहकांचे महत्वात वाढः** ग्रामिण भागाबरोबरच शहरी भागातील लहान लहान ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी बँक राष्ट्रियीकरणानंतर अधिक प्रयत्न केले गेलेत.
- **बँक व्यवसायाचे वैविधीकरणः** बँकाच्या राष्ट्रियीकरणानंतर बँक सेवांचे वैविधीकरण करण्यात आले जेणेकरुन बँक ग्राहकांना विविध ग्राहक उपयोगी योजनांचा लाभ देता येईल याबरोबर विविध प्राकारच्या सेवा सुविधा ग्राहकांना उपलब्ध करुन देता येतील याकरिता प्रयत्न करण्यात आला.
- **नफा वाढः** शहरी भागात एकवटलेली बँकिग व्यवस्था राष्ट्रियीकरणानंतर ग्रामिण भागात जावून शाखा विस्ताराच्या माध्यमातून बँकिंग सेवा पुरवू लागल्यामुळे ग्रामिण पैसा बचतीच्या माध्यमातून प्रवाहात आला, भांडवल रुपाने उद्योग व्यवसाय यासह प्राधान्य क्षेत्र, कृषिक्षेत्र, इ. ना बऱ्यापैकी वित्तपुरवठा होवू लागला त्याचा परिणाम म्हणुन बँकाचे उत्पन्नात वाढ झाली आणि पर्यायाने नफ्यातही वाढ झाली.
- **सुरक्षितताः** बँकाच्या राष्ट्रियीकरणानंतर खाजगी क्षेत्रातील १४ मोठ्या बँका ह्या शासनाच्या नियंत्रणाखाली आणल्या गेल्या त्यामुळे बँकांना शासनाचे पाठबळ मिळाले याचा परिणाम म्हणुन खाजगी क्षेत्रात असलेल्या ठेवींच्या तुलनेने राष्ट्रियीकृत बँकामधील ठेवी सुरक्षित वाटू लागल्या, म्हणुन खाजगी बँकांच्या तुलनेने राष्ट्रियीकृत बँकांची विश्वासार्हता वाढू लागली.
- **स्वंयरोजगार योजनांना वित्तपुरवठाः** बँक राष्ट्रियीकरणानंतर राष्ट्रियीकृत बँक ह्या शासनाच्या नियंत्रणाखाली आपला व्यवसाय करु लागल्यामुळे, शासनाला आपल्या विविध समाजउपयोगी योजना तसेच स्वंयरोजगाराच्या



Scanned with CamScanner

योजना राबविण्याचे एक माध्यम उपलब्ध झालेले होते. त्यामाध्यमातून शासन जनतेला रोजगार व स्वंयरोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने विविध योजनांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना म्हणजेच बेरोजगार, आर्थिक दुर्बल, मागासवर्गीय उमेदवार यांना स्वंयरोजगार निर्माण करण्याच्या उद्देशाने वित्तपुरवठा उपलब्ध करुन देते, जेणेकरुन याघटकला स्वत:चा रोजगार स्वत: निर्माण करता येईल.

वरिल सर्व विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी खऱ्या अर्थाने देशातील गरीबी आणि दारिद्रय निर्मलन करण्याच्या करण्याच्या उद्देशाने बँक व्यवसायाने प्राधान्य क्षेत्राला आणि ग्रामिण भागातील विविध घटकांना सढळ आणि मुक्त हस्ते वित्तपुरवठा, ग्रामिण आणि कृषीक्षेत्रावर आधारित रोजगारात वाढ व्हावी, त्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांचा विकास व्हावा या बरोबरच ग्रामिण भारताचा विकास व्हावा हा प्रमुख उद्देश समोर ठेवून देशातील बँकांवर सामाजिक नियंत्रण आणि त्यानंतर लगेचच १४ मोठ्या बँकाचे राष्ट्रियीकरण हा क्रांतीकारक निर्णय इंदिरा गांधी यांनी घेतला.

तत्कालीन पंतप्रधान बहादूर शास्त्री यांच्या अकस्मात निधनानंतर सत्तेची सर्व सुत्रे इंदिरा गांधी यांच्या हाती आली, त्यामुळे राजकिय क्षेत्रात मोठी उलथापालथ झालेली असतांना काही काळातच खाजगी क्षेत्रातील बँकांनी प्राधान्य क्षेत्र, कृषी क्षेत्र, ग्रामिण कारागीर, लघु उद्योग, कुटिर उद्योग, जोडधंदे यांच्या विकासाकरिता पुरेशा प्रमाणात वित्तपुरवठा करावा जेणेकरुन ह्या वित्तीय व्यवस्थेपासून दुर्लक्षित घटकांना सहज आणि सोपा वित्तपुरवठा व्हावा याकरिता खाजगी क्षेत्रावरिल बँकावर सामाजिक नियंत्रण लावण्याचा निर्णय घेण्यात आला व लगेचच काही महिण्यांनी बँक राष्ट्रियीकरणाचा निर्णय घेऊन वित्तीय क्षेत्रात खळबळ माजवून देशाच्या वित्तीय आणि आर्थिक विकासाच्यादृष्टिने टाकलेले त्यांचे महत्वपुर्ण पाऊल होते ते काही राजकिय व्यक्तींना न पटणारे जरी असले तरी देशातील ग्रामिण आणि शहरी भागातील आर्थिक विषमता दुर करण्याचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला आणि त्याचा परिणाम म्हणून १९८० ला सुध्दा ६ मोठ्या खाजगी बँकाचे राष्ट्रियीकरण करण्यात आले.म्हणुन स्व.इंदिरा गांधी यांचे देशातील वित्तीय व्यवस्थेतील विशेषत: देशाच्या ग्रामिण वित्तीय व्यवस्थेतील योगदान अनन्य साधारण आहे आणि ते अविस्मरणीय आहे.

**संदर्भ:**


1. आधुनिक बँकिंग आणि वित्तीय पध्दती, प्रा. श्याम साळुंखे व प्रा. विजय मांटे, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
2. Innovative Practices in Banking Business, Prof Shyam Salunkhe, Vision Research, Atharva Publication, Jalgaon.
3. www.google.com
4. www.wikipedia.com
5. Decoding Indira Gandhi's Bank Nationalization of 1969, www.thequint.com/news/politics/gujarat-election-2017-phase-2-polling-live-updates.
6. Was There a Prelude to The Nationalization Measure? www.thequint.com/news/politics/gujarat-election-2017-phase-2-polling-live-updates
7. Forget Political Goals, Did Nationalization do Anything Useful For The Economy? www.thequint.com/news/politics/gujarat-election-2017-phase-2-polling-live-updates
8. The Politics of Bank Nationalization, 1969-76, Suhit K. Sen
9. Economic Milestone: Nationalization of Banks (1969) Forbes India.


Scanned with CamScanner